**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
E-Mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३

क्र.एनजीसी/२०१५/रिक्त पदे/नावि/मवि-२ / २५९१ . दि. ४/३/२०१६ 5 MAR 2016

प्रति,

१.सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,

२. कुलसचिव,
सर्व अकृषि विदयापीठे,
महाराष्ट्र राज्य,

विषय - राज्यातील अकृषि विदयापीठातील अशासकीय अनुदानीत व कायम विना अनुदानीत महाविदयालयातील प्राचार्यांची व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शासनाने सर्व विभागातील अशासकीय अनुदानीत व कायम विना अनुदानीत महाविदयालयातील प्राचार्य व शिक्षकाच्या रिक्त पदांबाबत माहिती मागविली होती. त्यानुसार संचालनालयाने आपल्या विभागातील अशासकीय अनुदानीत व कायम विना अनुदानीत महाविदयालयातील प्राचार्य व शिक्षकाच्या बाबत अनुज्ञेय पदे, भरलेली पदे व रिक्त पदांबाबत माहिती पाठविण्याबाबत कळविले होते. सदरची माहिती विभागाकडून प्राप्त झाली असता असे निदर्शनास आले आहे की, काही महाविदयालयात प्राचार्य व शिक्षकांची रिक्त पदे अदयापही भरलेली दिसून येत नाही. तरी आपण आपल्या स्तरावरुन महाविदयालयातील रिक्त पदे भरण्याबाबत संबंधीत महाविदयालयांना सूचना देऊन तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

मुंबई विभागाने कायम विना अनुदानीत महाविदयालयातील प्राचार्य व शिक्षकांच्या अनुज्ञेय, भरलेली व रिक्त पदांची अदयापही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहिती प्राप्त न झाल्याने शासनास माहिती सादर करता येत नाही. तरी सदर पत्र प्राप्त होताच आपली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

विदयापीठांनी व सहसंचालकांनी आपल्या स्तरावरुन महाविदयालयातील रिक्त पदे भरण्याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन रिक्त पदे भरण्याबाबतची तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधीत महाविदयालयांना सूचना दयाव्यात

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सादर

"A"
Re-accredited By NAAC (2014) with CGPA-3.16)

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र**
**दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (सलंग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)**
ई मेलः affiliationt1@unshivaji.ac.in

**संदर्भ क्रं. ॲफि/टी.१/प्राचार्य/ चव्हाण/** 12912 **दिनांक :** 28 MAR 2016

प्रति.
प्राचार्य/संचालक,
सर्व सलंग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,

यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

आपला विश्वासू
उपकुलसचिव
संलग्नता विभाग